पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

अ प्रभाग समिती

सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक ०९]

**दिनांक : ११/१२/२०१८** **वेळ : सकाळी ११.३० वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे डिसेंबर 2018 **ची** मासिक सभा मंगळवार दिनांक ११/१२/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सभापती |
| 2. | मा.तुषार रघुनाथ हिंगे | सदस्य |
| 3. | मा.जावेद रमजान शेख | सदस्य |
| 4. | मा.वैशाली जालिंदर काळभोर | सदस्या |
| 5. | मा. बाबर शर्मिला राजेंद्र | सदस्या |
| 6. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 7. | मा.कोमल दिपक मेवानी | सदस्या |
| 8. | मा. सावंत राजेश पोपट | स्वीकृत सदस्य |
| 9. | मा. कदम सुनिल मानसिंग | स्वीकृत सदस्य |
| 10. | मा.कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्रीमती आशादेवी दुरगुडे, क्षेत्रिय अधिकारी, मा. श्री दिपक सुपेकर-प्र.कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.श्री. संजय खाबडे-कार्यकारी अभियंता विद्युत, मा.श्री प्रशांत पाटील-कार्यकारी अभियता(जनलि:स्सरण), मा.श्री आर.के.लटपटे – प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), मा.श्री. महादेव शिंदे –सहा. आरोग्याधिकारी, मा.श्री मुठाळ चंद्रकांत-उपअभियंता मा.श्री कोल्हे लक्ष्मीकांत-उपअभियंता(स्थापत्य), मा.श्रीमती लता बाबर-उपअभियंता(झोनिपु), मा.श्री मोहन खोंद्रे -उपअभियंता (झोनिपु स्थापत्य ), मा.श्री व्ही.के.जाधव्-उपअभियंता (उद्यान),मा.श्री कुंभार डी. एम.-उपअभियंता,पा.पु.,मा. श्री. एस.पी. काळे-उपअभियता(ड्रेनेज), मा.श्री गायकवाड पी.एम., उदयान अधिक्षक- उदयान विभाग, श्री अरुण सोनकुसरे-कार्यालय अधिक्षक (अतिक्रमण), श्री बाळासाहेब शेटे-कनिष्ठ अभियंता(बीआरटीएस), श्री. निखील फेंडर, कनिष्ठ अभियंता, श्री जी.आर.गोसावी-सहा.उदयान अधिक्षक, श्री डी.जी.कांबळे- उदयान सहाय्यक, श्री घुले संभाजी-व.आ.(झोनिपु) इ.अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, अनुराधा गणपत गोरखे यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक १:-** सन्मा.अध्यक्षा अनुराधा गोरखे यांचा दिनांक १०/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१० मधील महात्मा फुले पुतळा परिसर पिंपरी येथील आजूबाजूचे परिसराचे सुशोभिकरण करणे व त्या ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधणे.

**विषय क्रमांक २:-** सन्मा.अध्यक्षा अनुराधा गोरखे यांचा दिनांक १०/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१० चिंचवड स्टेशन येथील महावीर चौकाचे सुशोभिकरण करणे.

**विषय क्रमांक ३:-** सन्मा.सदस्या कोमल मेवानी यांचा दिनांक ११/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१९ मधील सेनेटरी चाळ व बी ब्लॉक १४ व १५ येथील जुने संडास बाथरुम तोडणेस मंजूरी मिळणे.

**विषय क्रमांक ४:-** क्षेत्रिय अधिकारी, अ क्षेत्रिय कार्यालय यांचे पत्र क्र.अक्षेका/२/कावि/३६८/२०१८
दिनांक १७/११/२०१८ रोजीचा प्रस्ताव.
हॉकर्स झोन पुन:स्थापित करणेसाठी उपसमितीने पाहणी केलेल्या ठिकाणांना मान्यता मिळणे.

**विषय क्रमांक ५:-** सन्मा.सदस्या वैशाली जालिंदर काळभोर यांचा दिनांक ११/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.
प्र.क्र.१४,मोहननगर येथील बंद असलेल्या धोबीघाटाजवळील असलेल्या पाण्याची टाकी पाडणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक ६:-** फरगडे फार्मर्स इंडिया प्रो.कंपनीचे प्रतिनिधी श्रीमती उषा नाना काळे यांचा दि.११/१२/२०१८ रोजीचा अर्ज.
सर्व्हे नं.G.P.१३२ , शिव शाहू उदयानासमोर, संभाजीनगर, पिंपरी चिंचवड येथील मोकळी जागा आठवडे बाजारासाठी देणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक ७:-** सन्मा.सदस्य जावेद शेख यांचा दिनांक ११/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.
प्रभाग क्र.१४ आ.क्र.२६८ आकुर्डी,मनपा हॉस्पिटलशेजारील मोकळया जागेत राधाबाई ॲग्रो फार्मसी यांना आठवडे बाजार सुरु करणेस मान्यता देणेबाबत.

**विषय क्रमांक ८:-** सन्मा.अध्यक्षा अनुराधा गोरखे यांचा दिनांक ११/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.
प्रभाग क्र.१० मोरवाडी येथे आनंदधाम स्मशानभूमी आहे, त्या स्मशानभूमी शेजारी आणखी एक दफनभूमी असून ती सध्या वापरात नाही. तरी सदर दफनभूमीचे **"आनंदधाम सर्व धर्मिय दफनभूमी"** असे नामकरण करणेस व सदर दफनभूमीचे सुशोभिकरण करणेस मान्यता देणे.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेण्यात आले.

----------------------

ठराव क्रमांक 51
दिनांक- 11/12/2018
सुचक: मा. तुषार रघुनाथ हिंगे

विषय क्रमांक 1
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.कोमल मेवानी

संदर्भ: सन्मा.अध्यक्षा अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक १०/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

वॉर्ड क्र.१० मधील महात्मा फुले पुतळा परिसर,पिंपरी येथील आजूबाजूच्या परिसरातील भागाचे सुशोभिकरण करणे तसेच त्या ठिकाणी जवळपास सार्वजनिक शौचालय सुविधा नसल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे त्या ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधणे आवश्यक असल्याने सदरचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 52
दिनांक- 11/12/2018
सुचक: मा.अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 2
विभाग : नगरसचिव(मुख्य कार्यालय)
अनुमोदक : मा. तुषार रघुनाथ हिंगे

संदर्भ:- सन्मा.अध्यक्षा अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक १०/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.
वॉर्ड क्र.१० चिंचवड स्टेशन येथील महावीर चौकाचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. तरी सदर चौकाचे सुशोभिकरण करणेचे कामकाजास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 53
दिनांक 11/12/2018
सुचक: मा. तुषार रघुनाथ हिंगे

विषय क्रमांक 3
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक: मा.शर्मिला बाबर

संदर्भ :- सन्मा. सदस्या कोमल मेवानी यांचा दि.11/12/2018 रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१९ मधील गेल्या २० वर्षापासून सेनेट्री चाळ व बी ब्लॉक १४/१५ येथील जुने संडासब्लॉक पूर्णपणे खराब झाले आहेत ती नवीन बनविणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे हे संडास बाथरुम तोडणे गरजेचे आहे. तरी सदरचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 54
दिनांक- 11/12/2018
सुचक: मा. मा.तुषार रघुनाथ हिंगे

विषय क्रमांक 4
विभाग : अ क्षे.का.प्रशासन यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.कोमल मेवानी

संदर्भ: पत्र क्र.अक्षेका/२/कावि/३६८/२०१८ दि.१७/११/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

अ क्षेत्रिय कार्यालयाकरिता स्थापन करणेत आलेल्या उपसमितीच्या सदस्यांनी हॉकर्सच्या ठिकाणांची पाहणी करुन सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये नमूद केलेप्रमाणे हॉकर्स झोन निश्चित केलेल्या ठिकाणांना मान्यता देणेबाबत मूळ प्रस्ताव सादर करणेत आला आहे. सदर प्रस्तावावर सांगोपांग चर्चा करुन चर्चेअंती सर्वानुमते असे ठरले की, संबधित प्रभागातील सदस्यांना विश्वासात घेऊन हॉकर्स झोन निर्मिती करावी व जुनी समिती (मध्यवर्ती हॉकर्स समिती) नियमानुसार बरखास्त् करुन नवीन कमिटी निर्माण करणेची कार्यवाही करावी या उपसूचनेसह सदरचा विषय मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 55
दिनांक- 11/12/2018
सुचक: मा. शर्मिला बाबर

विषय क्रमांक 5
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.कोमल मेवानी

संदर्भ: सन्मा.सदस्या वैशाली काळभोर यांचा दिनांक ११/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१४ मधील मोहननगर मधील महात्मा फुलेनगर(झोनिपु) धोबीघाट बंद करुन अनेक वर्ष झाली आहे. त्या धोबी घाटाजवळ असलेल्या पाण्याच्या टाकीचा काही उपयोग होत नाही. तेथे रहात असणा-या नागरिकांना त्या टाकीमुळे जाण्यायेण्याचा त्रास होत आहे. त्यामुळे ही टाकी लवकरात लवकर पाडण्याचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 56
दिनांक- 11/12/2018
सुचक: मा. तुषार हिंगे

विषय क्रमांक 6
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.अनुराधा गोरखे

संदर्भ: फरगडे फार्मर्स इंडिया प्रोडयुसर कंपनीचे प्रतिनिधी उषा नाना काळे
यांचा दिनांक ११/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

श्री फरगडे फार्मर्स् इंडिया प्रोडयुसर कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी यांनी दिनांक ११/१२/२०१८ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेप्रमाणे स.नं.G.P. १३२ शिव शाहू उदयानासमोर संभाजीनगर, पिंपरी चिंचवड येथील मोकळी जागा **"श्री फरगडे फार्मर्स् इंडिया प्रोडयुसर कंपनी"** यांना शेतकरी आठवडे बाजारासाठी देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता पुढील कार्यवाही करणेकामी भूमि जिंदगी विभागाकडे पाठविण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 57
दिनांक- 11/12/2018
सुचक: मा. जावेद रमजान शेख

विषय क्रमांक 7
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.अनुराधा गोरखे

संदर्भ: सन्मा.सदस्य् जावेद रमजान शेख व प्रमोद प्रभाकर कुटे यांचा दिनांक ११/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 14 आकुर्डी मनपा हॉस्पिटल शेजारील मोकळी मनपा आरक्षित जागा आ्रक्षण क्र.२६८ येथे **"राधाबाई अग्रो फार्मसी"** या शेतकरी आठवडे बाजार संघास आठवडे बाजार सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता पुढील कार्यवाही करणेकामी भूमि जिंदगी विभागाकडे पाठविण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 58
दिनांक- 11/12/2018
सुचक: मा. अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 8
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.शर्मिला बाबर

संदर्भ: सन्मा.अध्यक्षा अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक ११/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 10 मधील मोरवाडी येथे आनंदधाम स्मशानभूमी वापरात आहे. शेजारी आणखी एक दफनभूमी असून ती सध्या वापरात नाही. सदर दफनभूमीची जागा सर्वधर्मियांसाठी वापरणे योग्य् होईल.

तरी सदरच्या दफनभूमीचे **"आनंदधाम सर्वधर्मिय दफनभूमी"** याप्रमाणे नामकरण करणेस व तेथील आजूबाजूचे परिसराचे सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती- अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिति यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ अनुराधा गणपत गोरखे ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:- अक्षेका/9/कावि/206/2018 दिनांक:- 24/12 /2018

(रामकिसन लटपटे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित ----------------------

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
# अ क्षेत्रीय कार्यालय, प्रशासन विभाग
# निगडी - ४४.

**हॉकर्स झोन स्थळ प्रत्यक्ष पाहणी करून निश्चित करावयाच्या स्थळांच्या यादीबाबत..**

| अ.क्र. | नियोजित स्थळांचा तपशील | हॉकर्स क्षमता |
|---|---|---|
| १ | संत तुकाराम महाराज व्यापार संकुल समोर न्यु पुना बेकरी समोर भिंतीलगत ते सावली हॉटेल | |
| २ | शामराव विठ्ठल बँके समोर लोकमान्य हॉस्पिटल जवळ निगडी | |
| ३ | अ क्षेत्रीय कार्यालय जवळ मागील बाजुस पार्किंग प्लॉट लगत | |
| ४ | मनपा दवाखना आकुर्डी गावठाण ते नाल्यापर्यंत | |
| ५ | खंडोबा मंदिराजवळील भिंती बाहेत पी सी एमसी पाण्याच्या टाकीच्या भिंती पासुन | |
| ६ | शिवशाहु संभाजी उद्यान बर्ड व्हॅली जवळील बाजुस | |
| ७ | लोकमान्य हॉस्पिटल चिंचवडच्या बाजुला | |
| ८ | के.एस.बी.चौका जवळ कंपनी भिंतीजवळ | |
| ९ | भक्ती शक्ती चौकाच्या बाजुला भिंती झेंडाजवळ वाहतुक नगरीकडील रोड | |
| १० | वृदावंन हॉटेल ओपन प्लेस (प्रस्तावित) | |
| ११ | पेट्रोल पंपाजवळील थरमॅक्स चौक के एस बी रोड | |
| १२ | शिवनेरी सहकारी गृहरचना संस्था समोरील फुटपाथ म्हाडा | |
| १३ | खंडोबा माळा ते दळवीनगर पुलापर्यंत डावी बाजु | |
| १४ | बर्ड व्हॅली उद्याना समोरील भिंतीलगत | |
| १५ | आकुर्डी रेल्वे स्टेशन मेन बाजु पासुन रेल्वे लाईन लगत | |
| १६ | महात्मा फुले पुतळया समोरील बाजु | |
| १७ | साई सागर हॉटेल ते सिटी प्राईड हॉटेल पर्यंत | |
| १८ | पिंपरी शितळा देवी मंदिराशेजारी हॉकर्स हे पिंपरी रेल्वे भिंतीलगत | |
| १९ | पी.डब्ल्यु डी चे मोकळे मैदान (प्रस्तावित) | |
| २० | पिंपरी ओव्हर ब्रिज जवळील जुनी एम आय डी सी लगतची मोकळी जागा (प्रस्तावित) | |
| २१ | यशोपुरम जवळ नविन बांधण्यात आलेल्या ब्रिज खाली (देवी लिंक समोर) (प्रस्तावित) | |
| २२ | बौध्दनगर येथिल बि.नं.१ पाठी मागे रिकामे जागा | |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## अ क्षेत्रिय कार्यालय, निगडी - 44
### अ क्षेत्रिय कार्यालयाने यापुर्वी निश्चित झालेल्या फेरीवाला स्थळांची यादीबाबत..

| अ. क्र. | जुने वार्ड क्र. | स्थळ क्र. | हॉकर्स चे ठिकाण | हॉकर्स क्षमता | सध्याचे हॉकर्स |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 8 | 1 | एक्साईड बॅटरी रोड, महात्मा फुले उद्यान समोर | 60 | 20 |
| 2 | 8 | 2 | एक्साईड बॅटरी रोड, महात्मा फुले उद्यान समोर | 60 | 20 |
| 3 | 8 | 3 | रामनगर भाजी मंडई | 36 | 30 |
| | | | **एकुण** | **156** | **70** |
| 4 | 9 | 1 | मानप साई उघानाच्या सिमाभिंतीस लागून (साई आकेड समोर) | 5 | 0 |
| 5 | 9 | 2 | मनपाच्या संत बहिणीबाई चौधरी सपौघात जवळ (सिमा भिंतीलगत तिकट घराशेजारी) | 10 | 0 |
| 6 | 9 | 3 | सदाशिवा बहिरवडे क्रिडांगण (सिमा भिंती लगत) | 10 | 0 |
| 7 | 9 | 4 | बर्ड व्हेली सिमा भिंत लगत | 40 | 0 |
| 8 | 9 | 5 | अंब्रेला पार्क उघान जवळ (सिमा भिंती लगत | 5 | 0 |
| 9 | 9 | 6 | HDFC कॉलनी जवळ मनपा गाळे | 21 | 0 |
| 10 | 9 | 7 | जी ब्लॉक, शिवशाहू संभाजी उघान सिमाभिंती लगत (शिवशाहू संभाजी उघान) | 5 | 0 |
| 11 | 9 | 8 | पिलॅमिड हॉल शाहूनगर सिमाभिंतीलगत गेटचे उजव्या बाजुला (नव्याने सुचविणेत आलेले हॉकर्स स्थळ) | 0 | 0 |
| | | | **एकूण** | **96** | **0** |
| 12 | 10 | 1 | आकुर्डी खंडोबामाळ ते थर्मेक्स चौक | 15 | 15 |
| 13 | 10 | 2 | आकुर्डी खंडोबामाळ ते थर्मेक्स चौक | 15 | 15 |
| 14 | 10 | 3 | ग्लोब वाईन ते एस.आर.ए. | 5 | 5 |
| 15 | 10 | 4 | एस.आर.ए. ची उजवी बाजू | 20 | 10 |
| 16 | 10 | 5 | एस.आर.ए. ची डावी बाजू | 20 | 15 |
| 17 | 10 | 6 | आकुर्डी भाजी मंडई, नियोजित गाळे | 51 | 35 |
| | | | **एकूण** | **126** | **95** |
| 18 | 14 | 1 | जय ट्रेडर्स, पुणे मुंबई रस्ता | 30 | 30 |
| 19 | 14 | 2 | बालाजी पेट्रोल पंप शेजारी, भक्ति शक्ति चौक जवळ | 10 | 10 |
| 20 | 14 | 3 | से.नं.23, मनपा उद्यानाचे शेजारी, वाहतूंकनगरी | 20 | 0 |
| 21 | 14 | 4 | से.नं.23, मनपा उद्यानाचे शेजारी मोकळी जागा | 10 | 1 |
| 22 | 14 | 5 | शास्त्री चौक, प्राधिकरण, निगडी (काचघर चौक) | 10 | 10 |
| 23 | 14 | 6 | सेक्टर 25, कोटक महिंद्रा बँक ते दिल्ली स्वाद रस्ता, प्राधिकरण | 10 | 10 |
| 24 | 14 | 7 | प्राधिकरण सेक्टर 26, परमार कॉम्पलॅक्स समोरील रेल्वे लाईन लगतचा रस्ता (हॉकर्स एकुण क्षमता 150) | 30 | 15 |
| | | | **एकूण** | **120** | **76** |
| 25 | 15 | 1 | टिळक चौका लगत हॉटेल सावली ते सेंट उर्सूला शाळा रस्ता (रद्द) | 20 | 20 |
| 26 | 15 | 2 | टिळक चौक व्यापारी संकुल चे पाठीमागे नविन रस्ता (प्रस्तावित) | 20 | 10 |
| 27 | 15 | 3 | विठ्ठल मंदिर नियोजित रस्ता (प्रस्तावित) | -- | -- |
| | | | **एकूण** | **40** | **30** |
| 28 | 16 | 1 | आकुर्डी खंडोबामाळ रस्टन कंपनी मागील बाजू BRTS रस्ता रद्द | - | 5 |
| 29 | 16 | 2 | जय गणेश व्हिजन जवळ BRTS रस्ता रद्द | - | 0 |
| 30 | 16 | 3 | आकुर्डी रुग्णालयालगत आतील बाजुस जय गणेश व्हिजन कडे जाणारा रस्ता | 35 | 10 |
| 31 | 16 | 4 | गंगानगर, बीना शाळा व रेल्वे फाटक जवळ | 5 | 0 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 32 | 16 | 5 | गंगानगर, रेल्वे फाटक लाईन S.T.R. समोर | 5 | 1 |
| 33 | 16 | 6 | रेल्वे लाईन ते गंगानगर प्रवेश ठिकाण | 15 | 1 |
| 34 | 16 | 7 | आकुर्डी गावठाण, साई धाम सो. कंपाउंड | 5 | 0 |
| 35 | 16 | 8 | आकुर्डी गावठाण, विजय कॉलनी सोसायटी कंपाउंड | 15 | 0 |
| 36 | 16 | 9 | बलराम पंजाबी यांचे समोर, गंगानगरकडे | 10 | 0 |
| 37 | 16 | 10 | पांढरकर उद्यानाजवळ, गंगानगर रेल्वेलाईन | 5 | 0 |
| 38 | 16 | 11 | आकुर्डी रुग्णालय जवळ, चर्च कडे जाणारा रस्ता | 20 | 20 |
| | | | **एकूण** | **115** | **37** |
| 39 | 17 | 1 | हुतात्मा चौक, प्राधिकरण निगडी | 50 | 10 |
| 40 | 17 | 4 | भेळ चौक ते बिग इंडिया चौक, आयुर्वेद हॉस्पीटल रस्ता | 5 | 5 |
| 41 | 17 | 5 | म्हाळसाकांत शाळेचे शेजारी | 10 | 10 |
| 42 | 17 | 6 | म्हाळसाकांत शाळेचे शेजारी, गणेश मंदीरा जवळ | 10 | 5 |
| | | | **एकूण** | **75** | **30** |
| 43 | 25 | 1 | छत्रपती शिवाजी महाराज चौक (मुंबई पुणे रोड) ते चिंचवड स्टेशन | 15 | 15 |
| 44 | 25 | 2 | चिंचवड स्टेशन भाजी मंडई (नियोजित) | 55 | 50 |
| | | | **एकूण** | **70** | **65** |
| 45 | 26 | 1 | मोहननगर सांस्कृतिक भवनचे बाजूने रस्त्यालगत | 30 | 0 |
| 46 | 26 | 2 | मोहननगर सांस्कृतिक भवनचे प्रवेशद्वार क्र.1 | 15 | 0 |
| 47 | 26 | 3 | मोहननगर सांस्कृतिक भवनचे प्रवेशद्वार क्र.2 | 15 | 0 |
| 48 | 26 | 4 | बालाजी चौक, मोहननगर (1+1) | 41 | 10 |
| 49 | 26 | 5 | कै.शंकर शेट्टी उद्यान, मोहननगर | 10 | 0 |
| 50 | 26 | 6 | कै.शंकर शेट्टी उद्यान समोर, मोहननगर | 30 | 30 |
| 51 | 26 | 7 | जेम्स ऑटो ते एस.टी.स्टँड रस्ता, काळभोरनगर | 30 | 30 |
| 52 | 26 | 8 | जेम्स ऑटो ते एस.टी.स्टँड रस्ता, काळभोरनगर | 9 | 9 |
| 53 | 26 | 9 | मोहननगर प्रवेशद्वार | 25 | 25 |
| 54 | 26 | 10 | मोहननगर प्रवेशद्वार क्र. 2 | 10 | 10 |
| 55 | 26 | 11 | मनी पॉलीमर फॅक्टरी रस्ता | 5 | 5 |
| 56 | 26 | 12 | ESI हॉस्पीटल समोरील रस्ता | 15 | 15 |
| | | | **एकूण** | **235** | **134** |
| 57 | 27 | 1 | मारूती कापसे उद्यान, H Block, मोरवाडी | 30 | 5 |
| 58 | 27 | 2 | मोरवाडी कोर्ट ते I.T.I. रस्ता, मोरवाडी | 25 | 10 |
| 59 | 27 | 3 | मोरवाडी कोर्ट ते K.S.B. चौक रस्ता, स्प्री हॉटेल चे जवळ, मोरवाडी | 20 | 0 |
| 60 | 27 | 4 | अजमेरा म्हाडा कॉलनी कमान रस्ता (प्रस्तावित) | 20 | 5 |
| 61 | 27 | 5 | S.N.B.P. स्कूल ते म्हाडा कॉलनी | 25 | 10 |
| 62 | 27 | 6 | टेलिफोन भवन ते निरामय हॉस्पीटल, चिंचवड | 25 | 5 |
| 63 | 27 | 7 | अजमेरा ते मोरवाडी रस्ता, मनपा कापसे उद्यान | 20 | 10 |
| 64 | 27 | 8 | सिध्देश्वर कंपनी समोरून इंदिरानगर वसाहत कडे जाणारा रस्ता, इंदिरानगर, चिंचवड | 20 | 10 |
| | | | **एकूण** | **185** | **55** |
| | | | **एकूण वार्ड क्र.8 ते 27 (12 वार्ड)** | **1218** | **592** |

क्षेत्रीय अधिकारी
'अ' क्षेत्रीय कार्यालय
निगडी, पुणे-४११०४४.